# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.02.2026** **वारः मंगळवार**

---

1. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रान तीन दिवसांच्या भारतभेटीवर, पंतप्रधान मोदी आणि मॅक्रॉं यांच्यात आज मुंबईत चर्चा
2. सहावा भारत-फ्रान्स वार्षिक संरक्षण संवाद आज बंगळुरूमध्ये
3. इंडिया एआय इम्पॅक्ट समिटला नवी दिल्लीत प्रारंभ; आरोग्य मंत्रालयाच्या सही आणि बोध या राष्ट्रीय उपक्रमांचा आज होणार प्रारंभ
4. सहकार मंत्र्यांच्या मंथन बैठकीचे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन आणि
5. टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत श्रीलंका 'सुपर एट' फेरीत दाखल

**<u>मोदी</u>**

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रान यांचं तीन दिवसांच्या भारत भेटीसाठी काल मुंबईत आगमन झालं. राज्यपाल आचार्य देवव्रत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, यांनी राष्ट्राध्यक्ष मॅक्रान यांचं विमानतळावर स्वागत केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईत मॅक्रॉन यांची भेट घेतील. या भेटीदरम्यान दोन्ही नेते भारत-फ्रान्स धोरणात्मक भागीदारीतील प्रगतीचा आढावा घेणार असून प्रादेशिक आणि जागतिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत. दोन्ही नेते आज संध्याकाळी भारत-फ्रान्स नवोन्मेष वर्ष 2026 चे उद्घाटन करणार असून उभय नेते स्टार्ट-अप्स, संशोधक आणि इतर नवोन्मेषकांच्या मेळाव्याला संबोधित करणार आहेत.

**<u>राजनाथ संरक्षण</u>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि फ्रान्सचे संरक्षण मंत्री कॅथरिन वौट्रिन आज सहाव्या भारत-फ्रान्स वार्षिक संरक्षण संवादाचे संयुक्त अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. बंगळुरू इथं होणाऱ्या या बैठकीत, औद्योगिक सहकार्य वृद्धिंगत करण्यावर लक्ष केंद्रित केलं जाईल. तसंच द्विपक्षीय संरक्षण सहकार्याच्या व्यापक विस्तारावर चर्चा होईल. या बैठकीत, संरक्षण सहकार्य कराराचे पुढील 10 वर्षांसाठी नूतनीकरण होण्याची अपेक्षा आहे. तसेच दोन्ही देशांच्या संरक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीत हॅमर क्षेपणास्त्राच्या निर्मितीसाठी संयुक्त उपक्रम राबवण्याच्या सामंजस्य करारावरही स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे.

**<u>एआय इम्पॅक्ट समिट</u>**

इंडिया एआय इम्पॅक्ट समिट कालपासून नवी दिल्लीत सुरू झाली. या निमित्तानं भारत मंडपम इथं उभारलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट एक्सपोचं औपचारिक उद्घाटन काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव, राज्यमंत्री जितिन प्रसाद हेदेखील यावेळी उपस्थित होते. यावेळी पंतप्रधानांनी, विविध कंपन्या आणि संस्थांनी उभारलेल्या दालनांची पाहणी करून त्यांचं तंत्रज्ञान जाणून घेतलं. 'इंडिया-एआय इम्पॅक्ट समिट 2026' चे विषयसूत्र 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' अशी आहे; कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मानवकेंद्रित प्रगतीसाठी करण्याची भारताची कटिबद्धता यातून दिसून येते, असं पंतप्रधान मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात

म्हटलं आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारत वेगाने प्रगती करत असून, जागतिक विकासात महत्त्वाचं योगदान देत आहे, असं त्यांनी नमूद केलं. या परिषदेच्या माध्यमातून देशातील युवकांची क्षमता आणि कौशल्यही अधोरेखित होत असल्याचं त्यांनी सांगितलं. ग्लोबल साऊथमध्ये आयोजित करण्यात आलेली ही पहिली जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आहे. पाच दिवसांच्या या शिखर परिषदेमध्ये फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रान यांच्यासह विविध देशांचे प्रमुख नेते सहभागी होणार आहेत. तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योजक, आघाडीचे नेते, धोरणकर्ते आणि तज्ज्ञ या परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. शंभरहून अधिक देशांना या परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आलं असून दोन लाखांहून अधिक जणांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे.

**<u>नड्डा-एआय</u>**

इंडिया एआय समिटमध्ये, आज आरोग्य क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासंदर्भात, सही आणि बोध या दोन महत्त्वाच्या राष्ट्रीय उपक्रमांचा प्रारंभ होणार आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे पी नड्डा यांच्या हस्ते यांची सुरुवात होईल. स्ट्रॅटेजी फॉर आर्टिफिशियल इंटेलिजन्स इन हेल्थकेअर फॉर इंडिया म्हणजे सही आणि बेंचमार्किंग ओपन डेटा प्लॅटफॉर्म फॉर हेल्थ एआय म्हणजेच बोध असे हे दोन उपक्रम आहेत. भारताच्या आरोग्य सेवा प्रणालीत कृत्रीम बुद्धिमत्तेच्या सुरक्षित, नैतिक, प्रमाणाधारित आणि सर्वसमावेश अवलंब करण्यासाठीची मार्गदर्शक चौकट म्हणून एसएएचआय उपक्रम काम करणार आहे. तर बीओडीएच ही गोपनियतेचे संरक्षण करणारे व्यासपीठ आहे. जागतिक स्तरावर एक जबाबदार आणि स्पर्धात्मक आरोग्य एआय परिसंस्था तयार करण्याच्या दिशेने, देशाने टाकलेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

**<u>प्रधान-एआय</u>**

एआय इम्पॅक्ट परिषदेमध्ये आज, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन- पुशिंग द फ्रंटियर ऑफ एआय इन इंडिया या विशेष सत्राचे आयोजन करण्यात येणार आहे. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि शिक्षण राज्य मंत्री जयंत चौधरी या सत्राला उपस्थित राहाणार आहेत. शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआयच्या परिवर्तनकारी क्षमतेचा वापर करण्यासंदर्भात शिक्षण मंत्रालयाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांवर सत्रामध्ये भर देण्यात येणार आहे. हे सत्र नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या दृष्टीकोन आणि विकसित भारत 2047 या राष्ट्रीय ध्येयाशी सुसंगत असल्याचे शिक्षण मंत्रालयाने अधोरेखित केले आहे.

**<u>मंथन</u>**

गुजरातमधील गांधीनगर इथं आज राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार मंत्र्यांच्या उच्चस्तरीय राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शहा या परिषदेच्या अध्यक्षस्थानी असतील. ही 'मंथन' बैठक म्हणजे पंतप्रधान मोदी यांच्या 'सहकार से समृद्धी' हा दृष्टिकोन प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेनं टाकलेलं एक महत्त्वाचं पाऊल आहे. यामध्ये सहकारी क्षेत्र अधिक पारदर्शक, आधुनिक आणि सदस्य-केंद्रित करण्यासाठी संरचनात्मक सुधारणांवर लक्ष केंद्रित करण्यात आलं आहे. सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे सहकार मंत्री, वरिष्ठ अधिकाऱ्यांसह बैठकीला उपस्थित राहतील. या परिषदेत सहकारी बँकांचं डिजिटायझेशन, राज्य सहकारी कायद्यांमध्ये कायदेशीर सुधारणा आणि अमूल आणि एनडीडीबीच्या सहकार्याने दुग्ध यंत्रणेचा विस्तार यावर चर्चा अपेक्षित आहे. सहकारी संस्थांना तळागाळातील लोकांच्या रोजगाराचं आणि ग्रामीण स्वावलंबनाच्या शक्तिशाली केंद्राचं रूप देणं, हा या बैठकीचा उद्देश आहे.

**<u>शपथविधी</u>**

बांगलादेशचे पंतप्रधान म्हणून बीएनपीचे अध्यक्ष तारिक रहमान यांचा आज बांगलादेशात ढाका इथं शपथविधी होत आहे. या सोहळ्यात भारताचे प्रतिनिधी म्हणून लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला उपस्थित राहणार आहेत. परराष्ट्र

सचिव विक्रम मिस्री हे ही त्यांच्या समवेत असतील. बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी अर्थात बीएनपीच्या नेतृत्त्वाखालील आघाडीनं अलिकडच्या संसदीय निवडणुकीत मोठा विजय मिळवला आहे. बांगलादेशच्या अंतरिम सरकारनं भारतासह चीन, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, मलेशिया आणि श्रीलंका यासह 13 देशांच्या सरकार प्रमुखांना शपथविधीला उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित केलं आहे. आज सकाळी राष्ट्रीय संसद भवनात नवनिर्वाचित संसद सदस्य देखील शपथ घेतील.

**<u>पंतप्रधान-कोविंद</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांची दिल्लीतल्या नव्या सेवा तीर्थ या पंतप्रधान कार्यालयात भेट घेतली. कोविंद यांच्या भेटीने विविध विषयांवर अंतर्दृष्टी मिळते जी विचारप्रवण आणि समृद्ध करणारी असते असं पंतप्रधानांनी समाज माध्यमांतून दिलेल्या संदेशातून, नमूद केलं आहे. तर कोविंद यांनी लिहिलेल्या संदेशात, सेवा तीर्थ इथं पंतप्रधानांच्या भेटीने आनंद झाला, ही इमारत नागरिक देवो भव - सेवा, करुणा, कर्तव्य आणि राष्ट्र प्रथम यांचे मूर्त स्वरूप आहे. सेवेतून प्रशासनाचे शक्तीशाली प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

**<u>इराण अमेरिका चर्चा</u>**

इराणमध्ये अमेरिकेच्या लष्कर तैनातीमुळे असलेला तणाव कायम असताना, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची आज अणु चर्चेच्या दुसऱ्या फेरीसाठी जिनिव्हा इथं पोहोचले आहेत. तेहरानकडून आलेल्या माहितीनुसार, या वाटाघाटी अप्रत्यक्ष आणि ओमानच्या मध्यस्थीने होणार आहेत. तर इराणचा लढाऊ क्षेपणास्त्र कार्यक्रम आणि प्रादेशिक मित्र राष्ट्रांना पाठिंबा यांसह व्यापक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्याची इच्छा असल्याचे संकेत अमेरिकेने दिले आहे. वाटाघाटींमध्ये अमेरिकेचे मध्य पूर्वेतील राजदूत स्टीव्ह विटकॉफ जिनेव्हामध्ये अमेरिकेचे प्रतिनिधित्व करणार असल्याचे व्हाईट हाऊसने स्पष्ट केले आहे.

**<u>निर्यात</u>**

भारताच्या एकंदर निर्यात, विक्री आणि सेवा यांच्यामध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत 13 पूर्णांक 17 टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. गेल्या वर्षी जानेवारीमध्ये असलेल्या 71 पूर्णांक 9 शतांश अब्ज डॉलर्सच्या तुलनेत यंदा ती 80 पूर्णांक 45 अब्ज डॉलर्स झाल्याचे वाणिज्य मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीत नमूद केलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत श्रीलंकेने काल 'सुपर एट' फेरीत प्रवेश निश्चित केला. कॅंडी इथं झालेल्या सामन्यात श्रीलंकेनं ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय मिळवला. कोलकाता इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात काल इंग्लंडने इटलीवर 24 धावांनी विजय मिळवला.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.